ZPAHM-19029(14)/2/2024-PEDU

I/474393/2024

DIS/302803/2024

श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर, जि.अहमदनगर यांना जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करणेबाबत.

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्रमांक कार्या-2/खाचौ/ /2024
अहमदनगर दिनांक- / /2024
15/07/2024

वाचा:- 1.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/0924/221/2024 दि.22.03.2024
2.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/0924/227/2024 दि.28/03/2024
3.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/0924/273/2024 दि.24/04/2024
4.या कार्यालयाचे आदेश कार्या2/खाचौ/0924/322/2024 दि.30/05/2024
5.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 नियम 03(5)
6.महाराष्ट्र राज्य सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.निप्रआ-1112/ प्र.क्र.82/11-अ दि.20/04/2013

श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर , जि.अहमदनगर, येथे कार्यरत दिनांक 19/06/2023 पासुन टप्प्या-टप्प्याने गैरहजेरी कालावधी संपल्यानंतर रजेचा अर्ज देवुन गैरहजर आहेत. म.ना.से.(रजा) नियम 1981 मधील नियम 10 नुसार रजा हा हक्क नाही. परिणामी त्यांचे गैरहजेरीमुळे शालेय विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे त्यामुळे त्यांना दिनांक 22/03/2024 पासून जिल्हा परिषद सेवेतून तात्पुरते दूर करण्यात आलेले आहे व मुख्यालय कोपरगाव ठेवण्यात आलेले आहे.

प्रकरणी श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर, जि.अहमदनगर यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करणेकरिता संदर्भ क्रमांक 03 अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेमार्फत विभागीय चौकशी सुरु करणेत आलेली आलेली आहे. करिता श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर यांचा निलंबन कालावधी 03 महिण्यापेक्षा जास्त झालेने सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 14/10/2011 चे शासननिर्णयातील मुद्दा क्र.07 (अ) मधील तरतुदीनुसार चौकशी अहवालाचे निष्कर्षानुसार होणा-या शिस्तभंगाचे कारवाईचे अटीला अधिन राहुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढोकरवस्ती ता.नगर येथे उपाध्यापक या पदावर पुन:स्थापित करण्यात येत आहे.

सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी. श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर, जि.अहमदनगर यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे, अन्यथा निलबंन कालावधी वाढण्यास कर्मचारी स्वत: जबाबदार राहील. तसेच सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक 20240715160106 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 15-07-2024 16:31:07
आशिष येरेकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर, द्वारा व
प्रत :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती संगमनेर जि.अहमदनगर
2/- सदर आदेश श्री.प्रदीपकुमार बबनराव खिलारी उपाध्यापक जि.प.प्रा.शाळा तास (वनकुटे) ता.पारनेर, जि.अहमदनगर यांना बजाविण्यात येऊन त्यांची दिनांकीत नोंद घेण्यात यावी.